**Lokmat, Pune, Aug 27 2008**



■ टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे आयोजित 'टीसीएल आयटी क्वीझ' मध्ये पुणे विभागाच्या अंतिम फेरीत मंगळवारी डॉ. कलमाडी हायस्कूलच्या हर्ष अंकुलकर व हर्ष रविंदर या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. या वेळी त्यांना डेव्हिस कपचे कर्णधार नंदन बाळ यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

# 'टीसीएल आयटी क्वीझ'मध्ये कलमाडी हायस्कूल प्रथम

पुणे, दि. २६ (प्रतिनिधी) : टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसतर्फे आयोजित पुणे विभाग 'टीसीएल आयटी क्वीझ' मध्ये डॉ. कलमाडी हायस्कूलच्या हर्ष अंकुलकर व हर्ष रविंदर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. तर, द्वितीय क्रमांक डॉ. विखे पाटील हायस्कूलच्या तेजस देशपांडे व अमोल जोशी यांनी मिळविला. तृतीय क्रमांक आर्मी पब्लिक हायस्कूलच्या आदित्य रमाणी व गौतम सोनपूर यांनी मिळविला. अंतिम फेरीत सहा शाळांनी भाग घेतला होता.

अंतिम फेरीचे बक्षीस वितरण डेव्हीस टेनिस कपचे प्रशिक्षक व भारतीय ऑलिपिंक संघाचे कर्णधार नंदन बाळ यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवले पाहिजे.

अशा स्पर्धेतून अभ्यास करण्याची सवय विद्यार्थ्यांना लागते व त्यांना प्रोत्साहनही मिळते.''